ग्रामपंचायत अधिकारी,वर्ग ३ या संवर्गातून
विस्तार अधिकारी (कृषि) वर्ग-३ या संवर्गात
पदोन्नती देणे बाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद
कृषि विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र.कृषि/आस्था२/४४६/२०२६
अहिल्यानगर दिनांक स्वाक्षरीखाली नमुद केलेनुसार

वाचा – १. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१८/प्र.क्र.१५९/का-१२ दिनांक ०१/०८/२०१९.
२.महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१८/प्र.क्र.३६६/१६ ब दिनांक ०७/०५/२०२१.
३. पदोन्नती निवड समिती जि.प.अहिल्यानगर मंजुर इतिवृत्त दिनांक ०५/१०/२०२६.
४. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील पत्र क्र.साप्रवि-२/ग्रापं.२/ ४०९/२०२६ दिनांक ०६/०९/२०२६.

ग्रामपंचायत अधिकारी यांना विस्तार अधिकारी (कृषि) या संवर्गामध्ये पदोन्नती देण्याकामी संदर्भ क्र.४ अन्वये खालीलप्रमाणे नावे प्राप्त झाल्याने त्यांना पदोन्नतीने वेतनस्तर एस-१४ ३८६००-१२२८०० मध्ये त्यांचे नावासमोर रकाना ५ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी पदोन्नतीने खालील अटी व शर्तींना अधिन राहून पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचेनांव | सध्याचे कार्यालय | निवडीचा प्रवर्ग | पदोन्नतीने पदस्थापनादिलेल्या कार्यालयाचेनांव |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | श्री.शेलार सुनिल शामुवेल | पंचायत समिती पारनेर | जेष्ठतेनुसार | पंचायत समिती कर्जत |
| २ | श्री.तुपे यशवंत यादव | पंचायत समिती नेवासा | जेष्ठतेनुसार | पंचायत समिती कोपरगांव |
| ३ | श्री.वाळके दत्तात्रय गोविंद | पंचायत समिती अहिल्यानगर | जेष्ठतेनुसार | पंचायत समिती शेवगांव |

अटी व शर्ती

१. सदरची पदोन्नती ही मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरती स्वरुपात पदोन्नती देणेत येत आहे.
२. सदरची पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपात असल्यामुळे पदोन्नतीच्या दिनांकापासून पदोन्नतीच्या पदावर सेवाजेष्ठतेचा हक्क सांगता येणार नाही.
३. उपरोक्त पदाची वेतननिश्चिती साठी महाराष्ट्र शासन, वित्त विभागाकडील निर्णय क्रमांक व दिनांक ०६/११/१९८४ नुसार संबंधिताने एक महिन्याचे आत विकल्प देणे बंधनकारक राहील. मुदतीत विकल्प न दिल्यास नियमानुसार वेतननिश्चिती करण्यात येईल.
४. उपरोक्त कर्मचाऱ्यास यापुर्वी सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना अथवा सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना अंतर्गत वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी प्रदान करण्यात आलेली असल्यास त्यांची सदर पदोन्नतीमुळे पुनश्चः वेतननिश्चिती होणार नाही.

५. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही/२०१५/प्र.क्र.३०३/का.१२ दि.१२/०९/२०१६ अन्वये पदोन्नती नाकारल्यास पुढील दोन वर्षाच्या निवड सुचीमध्ये पदोन्नतीसाठी विचार केला जाणार नाही.

६. सुधारीत सेवातंर्गत आश्वासीत प्रगती योजने अंतर्गत पहिला/दुसरा/तिसरा लाभ मंजूरकेलेनंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या कर्मचा-यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येईल.

७. नेमणूकीचे ठिकाणी विहीत कालावधीत हजर न झाल्यास तसेच नेमणूकीचे पदस्थापनेत बदल करण्यासाठी कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधीलनियम ४ नुसार कारवाई करणेत येईल.

८. संबंधित कार्यालय प्रमुख यांना निर्देश देणेत येतो की,वरील पदोन्नती दिलेल्या कर्मचा-यांना स्थानिक व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे. कार्यालयाची निकड विचारात घेवून पदोन्नती देण्यात आलेली असल्याने १५ दिवसाचे आत पदोन्नतीच्या ठिकाणी हजर व्हावे. अन्यथा सेवाजेष्ठता डावलली जाईल याची नोंद घ्यावी.

सदरचा आदेशअहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.inया संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेला आहे. त्याचा संकेतांक क्रमांक 20261015090019 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 15-10-2026 12:45:24

**आनंद भंडारी** (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,अहिल्यानगर

प्रति, संबधित कर्मचारी
द्वारा गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर/नेवासा/अहिल्यानगर.

प्रत - १. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर.
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं) जिल्हा परिषद अहिल्यानगर.
३. गट विकास अधिकारी,पंचायत समिती कर्जत/कोपरगांव/शेवगांव